# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं / नाशप / ०३८ / २०१०

अर्जदार : श्रीमती सावित्री पूरसिंग चव्हाण
राहणार घर नं २६ / ३११, हुडको कॉलनी,
जरीपटका, नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
सिव्हील लाईन विभाग, नागपूर.

गणपूर्ती : १) श्रीमती मीरा खड ार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

२) श्रीमती के.के घरत
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

३) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

## आदेश

**दि. १६.०६.२०१०**

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार ची तक्रार अर्ज दिनांक २८.०४.२०१० रोजी म.राज्य विद्युत नियामक आयोग ग्रागानिम व विद्युत लोकपाल विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे

अर्जदाराच्या गा–हाण्याचा तपशील :–

१. विद्युत वापर कमी असुन सुध्दा माहे मे २००९ पासुन चुकीचे विद्युत देयके दिल्याबाबत श्रीमती सावित्री पुरसिंग चव्हाण, .राजरीपटका यांनी दिनांक २८.०४.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले आहे.

तसेच मंचाला मदतीची विनंती केली की

अ विद्युत देयके नियमाप्रमाणे देण्यात यावे

ब विद्युत पुरवठा पुर्ववत सुरू करण्यात यावा

२. दिनांक २१.०५.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली, दोन्ही पक्ष उपस्थित होते गैरअर्जदारातर्फे श्री एस. आर. गंधेवार, कार्यकारी अभियंता, सिव्हिल लाईन्स विभाग हे उपस्थित होते

अर्जदार श्रीमती सावित्री पुरसिंग चव्हाण यांनी आपली बाजु मांडतांना सांगितले की त्यांच्या घरी डिंसेबर २००८ मध्ये विद्युत जोडणी करण्यात आली. त्यानंतर पहिले विद्युत देयक मे २००९ मध्ये देण्यात आले तसेच रूपये १३८०/– अशी रक्कम असलेले पहीले विद्युत देयक अर्जदाराने २६.०५.२००९ रोजी भरले, परंतु जुन २००९ पासुन कमी वापर असतांनासुध्दा वाढीव विद्युत देयके पाठविण्यात आले

ते बिल चुकीचे असल्यामुळे अर्जदाराने भरणा केला नाही म्हणुन विद्युत मीटर जबरदस्ती काढुन नेण्यात आले वारंवार लेखी तकार दिल्यानंतरही पुन्हा अर्जदाराला रूपये १५,४०८.९४ भरणा करण्याची सुचना गैरअर्जदारातर्फे करण्यात आली अर्जदाराच्या घरी एक टयुॅब लाईट व एक पंखा असुन त्या आधारावर बिल देण्यात यावे, अर्जदाराने मंचासमोर अशी विनंती केली.

३. गैरअर्जदाराने मंचासमोर आपले स्पष्टीकरण देतांना सांगितले की अर्जदाराला विद्युत पुरवठा २८.०४.२००७ रोजी देण्यात आला,परंतु अर्जदाराला पधंरा महिन्याचे स्थिर आकाराचे पहिले बिल मे २००९ मध्ये देण्यात आले. त्यानंतर मे २००९ मध्ये पहिल्यांदा मीटर वाचन करण्यात आले व त्यानुसार ३६१९ युनिट विद्युत वापराचे रू.२४१०७.

५१ इतकी रक्कम असलेले विद्युत देयक जुन २००९ मध्ये अर्जदारास देण्यात आले.

४. गैरअर्जदाराने पुढे असेही म्हटले आहे की अर्जदाराने जुलै २००९ मध्ये तक्रार नोंदविल्यानंतर त्याचे बिल दुरूस्त करून ३६१५ युनिटचे 'स्लॅब बेनिफिट' दिले व अर्जदाराच्या देयकातून रू. २,२३६.३५ वजा करून सुधारीत देयक फेब्रुवारी २०१० मध्ये अर्जदाराला देण्यात आलेले आहे. सदर विद्युत देयक अर्जदाराने मान्य केले नाही व परत विद्युत देयकाविषयी तक्रार नोंदविली. तेव्हा एप्रिल २००९ मध्ये अर्जदारासमोर मिटर चाचणी करण्यात आली त्यात मीटर सुस्थितीत असल्याचे आढळले तसेच मीटर सुस्थितीत असलेला चाचणी अहवाल अर्जदाराला सुध्दा देण्यांत आला त्यामुळे विद्युत देयक पुन्हा दुरूस्त करण्यात आले नाही.

५. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर व सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केल्यानंतर मंचास असे स्पष्ट होते की अर्जदाराला पहीले विद्युत देयक विद्युत पुरवठा दिलेल्या तारखेनंतर एकुण २४ महिन्यांनी गैरअर्जदारातर्फे देण्यात आले तसेच मे २००९ वगळता जुन २००९ ते ऑक्टोबर २००९ पर्यंत 'मीटर नोंदी उपलब्ध नाही' असा शेरा असलेले विद्युत देयके देण्यात आले

तसेच विद्युत देयके दुरूस्ती अहवाल व मीटर चाचणी अहवाल बघता, गैरअर्जदारातर्फे केलेले समायोजन योग्य आहे व ही रक्कम विद्युत जोडणी पुर्ववत करण्याकरीता अर्जदाराने भरणे गरजेचे आहे असे मंचाचे मत आहे

तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण विनियम, २००५ कलम ९.१ असे नमुद केले आहे की, ग्राहकांच्या मीटर मध्ये नोंदी घेण्याचे काम अधिकृत प्रतिनिधीकडुन कृषी ग्राहक वगळता इतर सर्व ग्राहकांच्या बाबतीत प्रत्येक दोन महीन्यातुन किमान एकदा करण्यात येईल परंतु सदर प्रकरणामध्ये विद्युत जोडणी झाल्याच्या दोन वर्षानंतर अर्जदाराला पहील्यांदा विद्युत देयक पाठविण्यात आले यावरून गैरअर्जदाराचा निष्काळजीपणा दिसुन येतो व त्यामुळे अर्जदारास मानसिक

त्रास झाल्याचे लक्षात येते तेव्हा अर्जदाराला मीटर नोंदीचे देयक वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे तो भरपाई मिळण्यास पात्र आहे.

तेव्हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण विनियम, २००५ कलम १२ परिशिष्ट 'अ' अनुक्रमांक ७.१ अनुसार अर्जदाराला एकुण २९ महीन्याकरीता रूपये ५८००/- भरपाई देण्यात यावी.

## आदेश

अर्जदाराचा सदर अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे .

१. अर्जदाराला देण्यात आलेली विद्युत देयके योग्य प्रकारे आयोजीत केलेली आहेत.

२. विद्युत कायदा २००३ प्रमाणे अर्जदाराने थकबाकी भरल्यावर पुढील ४८ तासांत विद्युत पुरवठा सुरू करण्यांत यावा.

३. अर्जदाराला २९ महिन्यापर्यंत मीटर नोंदीचे विद्युत देयके न पाठविण्याबाबत रूपये ५८००/ – भरपाई देण्यात यावी.

४. गैरअर्जदाराला आदेश देण्यात येत आहे की आदेशाची प्रत मिळाल्यापासुन एक महीन्याचा आत कार्यपुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करण्यांत यावा.

| | | |
|---|---|---|
| सही/ – | सही/ – | सही/ – |
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चंद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या | सभापती |